ePaper

## राज्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस, द्राक्ष बागा जमीनदोस्त, आंब्यांनाही फटका



| वर्ष - 8 | अंक - 247 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 27 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत

- केकेआरचा राजस्थानवर विजय!
- डिकॉकच्या कॅचने सगळेच चकित
- उत्तर प्रदेशात मुसलमान सर्वात सुरक्षित
- ईडीचे प्रमुख मोदींना देणार आर्थिक सल्ला


### पुणे मनपाला डांबर पुरवठा न करताच हाती मिळतेय डिलिव्हरी पावती

# डांबर खरेदीत घोटाळा!

### करोडो रुपयांच्या खरेदीवर प्रश्नचिन्ह? डांबर खरेदी प्रक्रियेत पुणे मनपाला तोटा; नक्की कोणाचा किती वाटा ?

**| पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज**

**डांबर खरेदी प्रक्रियेमध्ये बदल झाल्यामुळे पुणे महानगरपालिकेला मागील काही वर्षांपासून वाढत्या तोट्याचा सामना करावा लागत आहे. नुकत्याच काढण्यात आलेल्या शेकडो कोटी रुपयांच्या निविदेमध्ये लाभाचा हेतू समोर ठेऊन पक्षपात झाल्याची शंका उपस्थित झाली आहे. पुणे महानगरपालिकेच्या (पीएमसी) डांबर खरेदी प्रक्रियेवर बारकाईने पाहिल्यास अनेक गोष्टी प्रामुख्याने समोर येतात, ज्यामध्ये होणारे आर्थिक नुकसान, रस्त्याच्या गुणवत्तेशी तडजोड, विशिष्ट कंत्राटदाराला पसंती देणे यामुळे लाचखोरीचा संशय बळावत आहे.**






**कंत्राटदार डांबर न पुरवता सुद्धा डिलिव्हरीची पावती मिळवण्यात होतोय यशस्वी; पालिकेचे डांबर जातंय कुठे?**

मुंबई रिफायनरी मधून खरेदी करण्यात आलेले डांबर घेऊन वाहन पुणे महानगरपालिकेच्या येरवडा येथील हॉटमिक्स प्लांटमध्ये पोहोचते पण तेथे गाडी खाली न करता त्यास डिलिव्हरीची पावती देण्यात येते अनेकदा वाहन पोहोचू न देता देखील अशा डिलिव्हरी पावती संबंधित पुरवठादारास पुरवल्या जातात आणि नंतर हा मुंबई रिफायनरी मधून पुणे महानगरपालिकेची आणलेला डांबराचा साठा पुणे जिल्ह्यात किंवा महाराष्ट्रात इतर ठिकाणी पुरवला जातो. क्षमतेनुसार एका गाडीतील डांबराचे किंमत 12 ते 16 लाखांपर्यंत असते. अशा प्रकारच्या अनेक गाड्या फक्त नावाला इन आऊट करण्यासाठी येरवडा येथील हॉटमिक्स प्लांटला जात असतात याच्या इन- आउट पावत्या तारीख, डांबराचे वजन, गाडी क्रमांक सह माहिती उपलब्ध असून तीच गाडी इतर ज्याठिकाणी खाली करण्यात आली याचे देखील पुरावे उपलब्ध आहेत. अशा प्रकारे कंत्राटदार पुरवठा प्रमाणात फेरफार करण्यासाठी पीएमसी अधिकाऱ्यांशी संगनमत करत असल्याचा आरोप करण्यात येत असून अधिक माहिती घेतल्यास करोडो रूपयांचा घोटाळा यामाध्यमातून उघडकीस येऊ शकतो.

### थेट खरेदी टाळल्याने रिफायनरीद्वारे मिळणाऱ्या सवलतीत घट

पीएमसीमधील सूत्रांचे म्हणणे आहे की “रिफायनरीजमधून थेट खरेदी करण्याऐवजी खरेदी आणि वाहतुकीसाठी कंत्राटदार नेमणे निविदा प्रणालीकडे वळल्याने केवळ खरेदीमध्ये मिळणाऱ्या सवलती कमी झाल्या नाहीत तर भ्रष्टाचाराचे मार्ग निर्माण झाले आहेत, परंतु एका विशिष्ट पुरवठादाराला फायदा व्हावा आणि अधिकाऱ्यांना बेकायदेशीर लाभ मिळावा यासाठी हि निविदा काढण्यात आल्याचे प्रथमदर्शी दिसते. गेल्या काही वर्षांपासून, पुणे महानगरपालिका एक सरकारी संस्था म्हणून, रस्ते बांधकामासाठी आवश्यक असलेले डांबर सरकारी रिफायनरीजमधून थेट मिळवत असे. या थेट संबंधामुळे व्यवहारात पारदर्शकता आली होती आणि भ्रष्टाचाराचे मार्ग बंद झाले होते. गेली काही वर्षांपासून डांबर खरेदी व वाहतुकीसाठी एकत्रित निविदा काढण्यात येत आहे. या बदलामुळे महानगरपालिकेला मिळणाऱ्या डांबर दर सवलतींमध्ये मोठी घट झाली आहे “निविदेतील अटी इतक्या विशिष्ट पद्धतीने टाकण्यात आल्या आहेत कि फक्त एकच कंत्राटदार प्रत्यक्षात पात्र ठरू शकतो,” अशी माहिती प्रकरणाशी परिचित असलेल्या एका सूत्राने नाव न सांगण्याच्या शर्तीवर दिली. सवलतींमध्ये होणारे करोडो रुपयांचे नुकसान आणि संभाव्य निविदा फेरफार सोबतच नक्की सदर डांबराचा पुरवठा होतो का? यावर देखील प्रश्नचिन्ह आहे.

### अनेकदा पुरवठा कमी तरीही अधिकारी गप्प

डांबराची थेट खरेदी करण्याबाबत विचारले असता वाहतूकदारांकडून डांबटाचा पुरवठा कमी होत असल्याची समस्या पालिकेचे अधिकारी खासगीत सांगतात. खरेदी आणि पुरवठ्याची एकत्रित निविदा काढून देखील सदर लाडका कंत्राटदाराला लाभ देण्याचे काम केले जात आहे. हे केवळ नागरिकांच्या कराच्या पैशाचे आर्थिक नुकसान नाही; तर सरकारी संस्थेतील विश्वासघात आणि भ्रष्टाचार आहे, आवश्यकतेपेक्षा कमी डांबर वापरल्यामुळे रस्त्यांवर खड्डे आणि इतर प्रकारचे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते, ज्यामुळे रस्त्याच्या देखभालीचा खर्च वाढतो आणि नागरिकांची गैरसोय होते. या प्रकरणात पालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचेही जाणकारांचे म्हणणे आहे. नक्की कोणाच्या दबावापोटी हा सगळा गैरप्रकार चालू

### संबंधितांवर कारवाई होणार का?

. अनेकदा निविदा प्रणालीकडे वळणे पारदर्शकतेला चालना देण्यासाठी असले तरी, यामुळे आर्थिक अनियमिततेसाठी संधी निर्माण झाल्या आहेत, डांबर खरेदी प्रक्रिया, निविदांच्या विशिष्ट अटी, खरेदी प्रणालीतील बदल आणि सामान्य माणसाचे पुढील नुकसान टाळण्यासाठी आणि पुण्यातील नागरिकांसाठी टिकाऊ, उच्च-गुणवत्तेच्या रस्त्यांचे बांधकाम सुनिश्चित करण्यासाठी या संपूर्ण डांबर खरेदी प्रक्रियेची आणि निविदा प्रक्रियेची, या पुरवठा न करता पावत्या मिळवून लाखोंची लूट करणाऱ्यांची चौकशी महानगरपालिका आयुक्त करणार का ? डांबर खरेदीमधील या मोठ्या दरोड्याशी संबंधितांवर कारवाई होणार का? भ्रष्टाचार मुक्त, पारदर्शक, नैतिक आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणारी हि खरेदी प्रक्रिया पुढील काळात असणार का? हा प्रश्न करदात्या पुणेकरांना पडला आहे.

ePaper राज्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस, द्राक्ष बागा जमीनदोस्त, आंब्यांनाही फटका



| वर्ष - 8 | अंक - 247 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

आतील पानांत
- केकेआरचा राजस्थानवर विजय!
- डिकॉकच्या कॅचने सगळेच चकित
- उत्तर प्रदेशात मुसलमान सर्वात सुरक्षित
- ईडीचे प्रमुख मोदींना देणार आर्थिक सल्ला

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 27 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकरांना मानतो

# संविधानात सर्वात मोठी ठेव लोकशाही!

## लंकेतील सीतेची सुटका, गीतेचा उपदेश, बुद्धाचं तत्त्वज्ञान संविधानातच; देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**“ही उद्देशिका आपली आहे. आम्ही भारतीय लोक सांगतो म्हणून हे जोपासण्याची जबाबदारी आपली आहे. पाश्चिमात्य देशातील हे संविधान नाही. ठिकठिकाणी बंधुता हे शब्द दिसतात. हे गौतम बुद्धांचे तत्वज्ञान आहे. संधीची समानता त्यांनी दिली. जात, धर्म यांच्या आधारे संधी दिली जाणार नाही. सर्वांना समान संधी दिली जाईल. लंकेतील सीतेची सुटकादेखील संविधानाच्या मूळ प्रतीमध्ये दाखवलेली आहे. ती यासाठी दाखवलेली आहे की आम्हाला या संविधानाचा नारी सन्मानासाठी वापर करायचा आहे, हे त्यातून अभिप्रेत करण्यात आलेले आहे. गीतेचा उपदेश देखील याच संविधानात दाखवला आहे. या तत्त्वांवर उभं राहिलेलं हे संविधान आहे. या संविधानात सर्वात मोठी ठेव ही लोकशाही आहे”, असे देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.**




विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. आज विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सांगता होणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दोन दिवशी भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधानाचा गौरव करण्यासाठी सभागृहात चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. भारतीय संविधान जगातील सर्वात चांगले संविधान आहे, असे देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मी संविधानाला व संविधान सभेला नमन करतो. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना शतशः नमन करतो. संविधानाने सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांती आणली. बाबासाहेबांमुळे रक्तविरहित क्रांती आणली. संविधान तयार करताना उच्च भारतीय मूल्यांचा विचार करून त्यावर आधारित संविधान बाबासाहेबांनी तयार केले. १९४६ मध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळ एका निर्णायक वळणावर पोहचली, तेव्हा इंग्रजांनी कॅबिनेट मिशन पाठवले. त्या कॅबिनेट मिशनने रिपोर्ट दिला की स्वातंत्र्य भारताचे संविधान तयार करावे लागेल. त्यावेळी संविधान सभा निर्माण करण्याचा निर्णय झाला, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### संविधानाचे शिल्पकार हे बाबासाहेब आंबेडकर

“१९३५ चा कायदा हा एक प्रकारे संविधान होते. पण ते इंग्रजी राज्य चालवण्यासाठी भारतीय लोकांचा सहभाग असावा यासाठी होते. ते आपण संविधानात परावर्तित केले नाही. संविधानाने एकएक आर्टिकलवर चर्चा केली आहे. मग स्वीकार केला आहे. १६५ दिवस ही चर्चा झाली. ९ डिसेंबर १९४६ रोजी पहिली चर्चा तर २४ जानेवारी १९५० रोजी शेवटची चर्चा झाली. तीन वर्षे हे काम सुरु होते. जगाच्या पाठीवर सर्वात प्रदीर्घ काम ज्या संविधान सभेने काम केले ती ही भारताची संविधान सभा होती. ३८९ सदस्य यामध्ये होते. ९ डिसेंबर १९४६ ला पहिले अधिवेशन झाले. तेव्हा सुरुवात हा वंदे मातरम् गीताने झाली. आचार्य कृपलानी यांनी पहिले भाषण केले होते. एकट्या बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुतांश ड्राफ्ट तयार केला.म्हणून संविधानाचे शिल्पकार हे बाबासाहेब आंबेडकरांना मानतो”, असे देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.

“आता संविधानमध्ये बदल झाला आहे. मसुदा वेळी ७ हजारांहून अधिक सुधारणा सुचविल्या होत्या. त्यातील २ हजार स्विकारल्या. त्यानंतर १०६ सुधारणा झाल्या. ओबीसी आयोगाला संविधान दर्जा, जीएसटी साठी झालेली सुधारणा ही नुकतीच झालेली आहे. महिलांना संसदेत व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याची सुधारणा आहे. देशाला दिशा देणाऱ्या या सुधारणा मोदी सरकारच्या काळात झाल्या आहेत. राजकीय नेते बदलले, राजकीय राजे बदलले. पण समाज एक राहिला. त्यातील पारंपरिक भाव एक राहिला. त्यामुळे राजकीय व्यवस्था तयार करायची होती, तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवणारे संविधान तयार झाले. भारताची निती काय, हे संविधानाची उद्देशिका सांगते”, असे

### भारतीय जीवन पद्धत ही संविधानाचा आत्मा

“महात्मा गांधी नेहमी म्हणायचे रामराज्य आणायचे आहे. राजा जेव्हा भेदभाव करत नाही, त्याला रामराज्य म्हणतात. समाजातील छोट्या छोट्या लोकांना एकत्रित करून त्यांना शक्ती राजा देतो त्याला रामराज्य म्हणतात. हे पूर्णतः भारतीय मूल्यांवर तयार केलेले संविधान आहे. अशोक चक्र हे कायद्याचे व धर्माचे चक्र आहे. धर्म हे सातत्याने पुढे जाणारे गतीमान चक्र आहे. काळाच्या बरोबर चालण्याचे धैर्य दाखवले नाही, तर आपण पुढे जाऊ शकत नाही. भारतीय जीवन पद्धत ही संविधानाचा आत्मा आहे. म्हणून अंतिम भाषणात बाबासाहेब म्हणाले.””दोन घटकांनी टीका केली. एक कम्युनिस्ट व समाजवादी पार्टी, कम्युनिस्टांना संविधानातून हुकुमशाही अपेक्षित होती. संविधानातील मुलभूत अधिकार हे हवे होते. नानाभाऊ आता काय वेगळे सुरु आहे. देशातील प्रमुख संस्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे. देशातील अशा संस्था बदनाम करायच्या, का तर आपण सत्तेत येऊ शकत नाही म्हणून. संविधानाने मुलभूत हक्क आहेत. कायद्यासमोर समानता आहे. धर्म, भेद यावरून भेदभाव करता येणार नाही. सामाजिक समानता, समान संधी, आर्टिकल १५ मध्ये भेदभाव करता येणार नाही, असे बाबासाहेबांनी सांगितले. पण एखादा समाज जर मागे राहिला असेल तर शैक्षणिक आरक्षण तरतूद केली. संधीची समानता आपण म्हणतो याचा अर्थ ज्यांच्यावर अन्याय झालाय. कुठलेही लाभ मिळाला नाही. त्यांना जन्मापासून सोन्याचा चमचा घेऊन आलेल्या सोबत स्पर्धा करायला लावली तर तो अन्याय असतो”, असे ही देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

## ऑनलाइन पद्धतीने ठेवले जाणार लक्ष

# सांडपाणी प्रकल्पासंदर्भात सर्वंकष धोरण!

## गृहप्रकल्पात मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील गृहसंकुले, मोठ्या गृहप्रकल्पांमध्ये उभारण्यात आलेल्या सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर बंद ठेवले जात असल्याने आता गृहप्रकल्पातील एसटीपी प्रकल्पांसाठी सर्वंकष धोरण तयार केले जाणार आहे. तसेच, सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित आहेत की नाही, यावरही ऑनलाइन पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे.**



शंभरहून अधिक सदनिका असलेल्या मोठ्या गृहप्रकल्पात सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. त्यानुसार सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारले जातात. मात्र, ते केवळ बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळेपर्यंतच सुरू ठेवले जातात. त्यानंतर प्रकल्प बंद ठेवले जात असल्याने महापालिकेच्या सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्पांवरील ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांडपाणी व्यवस्थापनासंदर्भात बैठक घेतली. त्यामध्ये सोसायट्यांवर अंकुश ठेवण्यासाठी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पासंदर्भातील सर्वंकष धोरण आखण्याचे निश्चित करण्यात आले.शहरामध्ये प्रतिदिन एक दशलक्ष लिटर (एमएलडी) एवढ्या पाण्यावर प्रक्रिया होणे आणि त्यानंतर ते नदीपात्रात सोडून देणे अपेक्षित आहे. 'मात्र, महापालिकेकडील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता कमी आहे.

सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने जायका प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प अद्यापही पूर्ण झालेला नाही. जायका प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महापालिकेच्या प्रक्रिया प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये वाढ होऊन प्रतिदिन साडेआठशे ते नऊशे एमएलडी एवढ्या पाण्यावर प्रक्रिया होईल, असा दावा महापालिकेकडून करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील मोठी गृहसंकुले, गृहप्रकल्पांमधील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यास प्रतिदिन ११० एमएलडी एवढ्या पाण्यावर प्रक्रिया करणे शक्य होणार आहे. त्यामुळे सोसायट्यांच्या आवारातील बंद सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांवर महापालिकेने लक्ष केंद्रित केले आहे.दरम्यान, शहरातील किती सोसायट्यांमध्ये सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प आहेत, याची कोणतीही अचूक माहिती महापालिका प्रशासनाकडे नाही. मात्र, महापालिकेकडे असलेल्या नोंदीनुसार ६०० सोसायट्यांनी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांसाठी परवानगी घेतली आहे. महापालिकेच्या मलनिस्सारण विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार केवळ २५० सोसायट्यांमध्ये प्रक्रिया प्रकल्प असून, त्यातील २२५ प्रकल्प नियमित आणि पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### सोसायट्यांकडून नियमानुसार दंड

सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प चालविण्यासाठी वार्षिक पंधरा ते वीस लाखांचा खर्च येतो. प्रक्रिया प्रकल्पामधील शुद्ध झालेले पाणी फ्लशसाठी वापरले जाते. हा प्रकल्प बंद असल्यास सोसायट्यांकडून नियमानुसार दंड आकारला जातो. गृहप्रकल्पातील एसटीपी प्रकल्पांसाठी सर्वंकष धोरण तयार केले जाणार आहे.

---

## शहरात अत्याधुनिक सीसीटीव्हींचे जाळे

# सीसीटीव्हीसाठी पाचशे किलोमीटरच्या केबल्स टाकण्यास मान्यता

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी आणि इंटिग्रेटेड कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटर (आयसीसीसी) उभारण्यासाठी पाचशे किलोमीटर लांबीच्या केबल्स शहरात टाकण्यात येणार आहेत. पुणे पोलीस आणि महाप्रीतकडून केबल्स टाकण्यात येणार आहे.**



यातील २३० किलोमीटर लांबीच्या अंतरात एकाचवेळी खोदाई होणार असल्याने दोन्ही यंत्रणा केबल टाकण्याचे काम एकत्रित करणार असून महाप्रीतकडून रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करण्यात येणार आहे. उर्वरित लांबीच्या रस्त्यांच्या पुनर्डांबरीकरणासाठी राज्य शासनाकडे निधीची मागणी केली जाणार आहे.

पुणे पोलीस सिटी सर्व्हेलन्स प्रकल्पाअंतर्गत शहरात अत्याधुनिक सीसीटीव्हींचे जाळे निर्माण करणार आहेत. तर आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत केंद्राकडून मिळालेल्या निधीतून महाप्रीततर्फे शहरात आयसीसीसीची उभारणी केली जाणार आहे. त्यासाठी या दोन्ही यंत्रणांना प्रत्येकी पाचशे किलोमीटरची खोदाई करावी लागणार आहे.

दोन्ही यंत्रणांनी स्वतंत्रपणे खोदाई केल्यास शहरातील रस्त्यांची दुरवस्था होण्याची शक्यता आहे.या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त,प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि पथविभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांची चर्चाही झाली होती. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी यांनी मंगळवारी पोलीस अधिकारी आणि महाप्रीतच्या पदाधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. त्यामध्ये दोघांनी एकत्रित काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. महाप्रीत आणि पोलीस या दोन्ही यंत्रणांना सुमारे २३० किलोमीटर लांबीच्या केबल्स एकाच परिसरात टाकायच्या आहेत. त्यामुळे दोन्ही यंत्रणांना एकाच वेळी केबल टाकण्याचा पर्याय देण्यात आला आहे. केबल टाकून झाल्यानंतर महाप्रीत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करून देणार आहे.

### 36.6 मीटरचा छेद घ्यावा लागणार

त्याचबरोबर मिशन १७ अंतर्गत महापालिका सुमारे ८० किलोमीटरच्या रस्त्यांची दुरुस्ती करणार आहे. त्यापूर्वीच दोन्ही यंत्रणांनी केबल टाकून घेतल्यानंतर या रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण केले जाईल. या निर्णयाला दोन्ही कंपन्यांनी होकार दर्शवला आहे,' असे पृथ्वीराज बी.पी. यांनी सांगितले. या दोन्ही खोदाईसाठी ३६.६ मीटरचा छेद घ्यावा लागणार आहे.

## महापालिकेच्या मालमत्ताकरवाढी केलेल्या उपाययोजनांची राज्यस्तरीय दखल

# करवसुली गतिमानतेमुळे पटकावला राजीव गांधी पुरस्कार!

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धेमध्ये मिळाले दहा लाखाचे पारितोषिक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ता कर संकलनामध्ये वाढ होण्यासाठी राबवलेल्या उपाययोजनांची दखल राज्य सरकारने घेतली आहे. महानगरपालिकेला राज्य सरकारच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार व दहा लाखांचे बक्षीस मिळाले आहे. याबाबतचा शासन निर्णय राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने काढला आहे.**




पिंपरी चिंचवड शहराचा विकास झपाट्याने होत आहे. या वाढणाऱ्या शहरामध्ये दरवर्षी मालमत्तांच्या संख्येमध्ये सुध्दा झपाट्याने वाढ होत आहे. नागरिकांना पायाभूत सोयी सुविधा देण्यासाठी महानगरपालिकेचा मालमत्ताकर हा उत्पन्नाचा स्त्रोत असून करसंकलन करण्यासाठी महानगरपालिकेने विविध उपाययोजना केल्या. यामध्ये मालमत्ताकर वाढीसाठी करसंकलन विभागाने ऑनलाइन सुविधा, मालमत्ता जप्ती लिलाव प्रक्रिया, मालमत्तांचे जिओ सिक्वेंसिंग, प्रत्येक मालमत्तांसाठी विशेष युपीक-आयडी यासारख्या आदी उपाययोजनांचा समावेश आहे. या उपाययोजनांमुळे करसंकलनामध्ये वृध्दी होण्यास मदत झाली आहे. याबाबतचा प्रस्ताव करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने राज्य सरकारच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेसाठी पाठवला होता. त्यानंतर राज्यस्तरीय निवड समितीकडून या प्रस्तावाची दखल घेत मालमत्ता करवाढीसाठी केलेल्या उपाययोजनांसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला शासनाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार व दहा लाखांचे बक्षीस जाहीर केले आहे.

### उपाययोजनांमुळे करसंकलनामध्ये 'विक्रमी' वाढ !

करसंकलन विभागाने राबविलेल्या विविध उपाययोजनांमुळे करसंकलनामध्ये विक्रमी वाढ झाली. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये ६२८ कोटी तर सन २०२२-२३ मध्ये ८१६ कोटी व सन २०२३-२४ मध्ये ९७७ कोटींचा विक्रमी कराची वसुली करण्यात आली. यामध्ये सन २०२३-२४ मध्ये ऑनलाइन माध्यमातून ५५४ कोटींचा कर भरण्यात आला. त्यासोबतच विभागाने दिलेल्या सवलतींमुळे पहिल्या तिमाहीमध्येच ४४९ कोटींचा कर भरण्यात आला. यामध्ये विभागाने राबविलेल्या उपाययोजनांचा मोलाचा वाटा असून अत्याधुनिक तंत्रज्ञान, माहितीचे विश्लेषण, प्रभावी जनजागृती आदी उपाययोजनांचा प्रमुख वाटा आहे.

"पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाने राबवलेल्या उपाययोजनांची दखल घेत राज्य सरकारने दिलेला पुरस्कार ही सर्वच पिंपरी चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे. मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून शहराचा विकास करण्यासाठी यामाध्यमातून मोठा निधी उपलब्ध होत असतो. आता आर्थिक वर्ष २०२४-२५ संपण्यासाठी अवघे पाच दिवस शिल्लक असून जास्तीतजास्त मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरून शहराच्या विकासासाठी निधी उभारण्यास हातभार लावावा.

**–शेखर सिंह,**
आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका

---

# पिंपरीत 'द बर्निंग वेनस्डे'!

## एचए कंपनीच्या आवारातील भंगार साहित्याला आग; तब्बल 1 बंबांच्या साह्याने आगीवर नियंत्रण

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड शहरात आगीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे. हिंदुस्थान अँटीबायोटीक्स (एचए) कंपनीच्या आवारात दुपारी सव्वातीनच्या सुमारास वाळलेल्या गवताला आग लागल्याने त्या ठिकाणी असलेल्या भंगार साहित्याने पेट घेतला. तब्बल दहा बंबांच्या सहाय्यान आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन विभागाच्या जवानांना यश आले. तर, काळेवाडी येथे कचऱ्याने पेट घेतल्याने चारचाकी वाहनांना आग लागल्याने सहा वाहने जळून खाक झाली.**

पिंपरी येथील एचए कंपनीच्या मागील बाजूस लोहमार्गालगत रेल्वे प्रशासनाने वाळलेले गवत पेटवले होते. त्यांनी ती आग विझविली होती. मात्र, काही वेळानंतर या आगीच्या ठिणग्या एचए कंपनी आवारातील गवतापर्यंत पोहोचल्या आणि गवताने पेट घेतला. त्यानंतर त्या ठिकाणी असलेल्या भंगार साहित्यानेही पेट घेतला. आगीची वर्दी मिळताच महापालिका अग्निशमन दलाचे दहा ते बारा बंब घटनास्थळी दाखल झाले. भंगाराने पेट घेतल्याने आग आटोक्यात आणण्यास विलंब झाला. सांयकाळी उशिराने येथील आग आटोक्यात आली. पुन्हा

### काळेवाडीत सहा वाहने जळून खाक




आगीने पेट घेऊ नये, यासाठी सर्व परिसरात कुलींग करूनच जवानांनी बंब हलविले. काळेवाडी येथील ज्योतिबानगरमधील गणेश मंदिरासमोरील मोकळ्या जागेत वाहने पार्क केली जातात. पार्किंगच्या बाजूला कचरा साठला असून कचऱ्याने पेट घेतल्याने आजुबाजूच्या वाहनांनी पेट घेतला. यामध्ये सहा वाहने जळून खाक झाली. सुदैवाने यामध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र, सहा वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. परिसरातील नागरिकांनी अग्निशमन विभागाशी संपर्क साधला असता अग्निशमन बंब वेळेवर पोहोचूनही अरूंद आणि चिंचोळ्या मार्गामुळे घटनास्थळापर्यंत बंब पोहोचू शकले नाही. त्यामुळे आणखी नुकसान झाले.

### एचए कंपनीचा गलथान कारभार उघड

एचए कंपनीत ४ जून २०२० रोजी आग लागल्यानंतर आग आटोक्यात आणण्यासाठी गेलेल्या महापालिका अग्निशमन दलाला एचए व्यवस्थापनाच्या अग्निशमन त्रुटी मोठ्या प्रमाणात निदर्शनास आल्या होत्या. एचए कारखान्यामधील ॲसिड टँक परीसरालगत इलेक्ट्रिकल वायरिंग जमिनीलगत केलेले असून त्यावर कागदी पुठ्यांचे बॉक्स, प्लाास्टिकच्या व वैद्यकीय बॉटल्स, वाळलेले झाडे झुडपे, गवत साठविण्यात आलेले होते. तसेच, अन्य ज्वलनशील भंगार साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत ठेवण्यात आले आहे. कारखान्यामध्ये अग्निशमन कार्याकरिता आवश्यक पाणीपुरवठा उपलब्ध नव्हता. स्थायी अग्निशमन यंत्रणेचा वापर उपलब्ध तैनात सुरक्षा रक्षकाद्वारे करणे आवश्यक होते. परंतु, सदर स्थायी अग्निशमन यंत्रणा उपलब्ध झाली नाही. कारखान्यामध्ये मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे, गवत वाढलेले असून ते वेळोवेळी छाटण्यात आलेले. नसल्याने मोठ्या आगीचा धोका संभवतो. कारखान्यामध्ये प्रत्यक्ष आगीच्या परिस्थितीत सुरक्षित कार्य करण्याकरिता सुरक्षारक्षकांना व अन्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षिण दिलेले नसल्याबाबतही निदर्शनास आले होते. याबाबत अग्निशमन विभागाने एचए कंपनीला नोटीसही दिली होती. मात्र, २०२० मध्ये नोटीस देऊनही कंपनी व्यवस्थापनाने कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याचे बुधवारी लागलेल्या आगीतून समोर आले आहे.

# विरोधक पेटले, आले अंगावर, फडणवीसांनी घेतले शिंगावर !

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचातले विषयसुख हे खरे सुख नाही.

मनुष्य जगात कितीही मोठा असला तरी त्याच्या प्रपंचात काहीतरी न्यून असतेच. न्यूनता नाही असा प्रपंचच नाही. एखादा प्रापंचिक 'माझा प्रपंच पूर्ण आहे' म्हणून सांगणारा भेटेल, परंतु 'चालले आहे असेच चालावे, यात कमी तर नाही ना कधी पडणार ?' अशी त्याला काळजी असतेच; म्हणजे त्याला खरे सुख असे नसतेच. एखादा अत्यंत विषयी, त्याला कदाचित काळजी नसेल. दारूच्या धुंदीत असणाऱ्याला राजाचीही पर्वा नसते, वस्त्राचीही शुद्ध नसते, आणि तो आपल्याच धुंदीत, आनंदात असतो; पण हे सर्व त्याची धुंदी उतरली नाही तोपर्यंतच. विषयातले सुख परावलंबी, विषयांवर अवलंबून असते. विषय हे नश्वर, आपल्यापासून कधी तरी जाणार; निदान आपल्याला तरी त्यांच्यापासून एक दिवस जावे लागणार. दुसरी गोष्ट म्हणजे, विषयाचे सुख इंद्रियाधीन असते. इंद्रिये विकल झाली म्हणजे सुख कसे मिळणार ? उद्या आपण मरणार हे समजले की कोणते विषय आपल्याला सुख देतील ? सारांश, विषयात सुख नाही. जे सुख होतेसे वाटते ते आपल्यातच असते, आणि ते विषयापासून मिळते अशी आपली फसवणूक मात्र होते.

तर मग सुख कशात आहे ? पुष्कळ वस्तू पुष्कळ मिळाल्या तर पुष्कळ सुख मिळते हा भ्रम आहे. खरे किंवा पुष्कळ सुख म्हणजे कायमचे, सनातन सुख होय. ते सनातन वस्तूपाशीच, म्हणजे भगवंतापाशीच असते. आपल्याप्रमाणे पशूंनाही विषयसुख आहे; त्यांच्यात आणि आपल्यात फरक तो कोणता ? मी कोण, कशासाठी आलो, असा विचार करणे याला सारासार विचार म्हणतात. प्रपंचातही आपण विचार करतोच; कशात आपला फायदा आहे, कशात आपला तोटा आहे, हे बघतो. पण सर्वच असार, त्यात सार ते कुठून, कसे येणार ? असलेल्या परिस्थितीत आपण समाधान मानीत नाही. त्याहून अधिक सुखाच्या स्थितीची इच्छा धरतो. देवाची भक्ती करणे, संतांकडे जाणे, हे सुद्धा विषय मिळविण्याकरिता आपण करतो; मग आपली ही सेवा, भक्ती विषयांची झाली का संतांची ? देव, संत यांचा उपयोग इतर गोष्टींप्रमाणे विषय मिळविण्याचे साधन म्हणून नाही का आपण करीत ? मांजर आडवे गेले की, आपले काम होणार नाही, ही भगवंताची सूचना आहे, असे समजून आपण परततो; पण एक बायको मेली की दुसरी करण्याच्या विचाराला लागतो ! सारांश, आपले ध्येयच विषय हे असते, आणि ते मिळविण्याची आपली खटपट असते. खरोखर, जो मनुष्य प्रपंचातला आपला अनुभव जमेस धरीत नाही, तो कशानेच शहाणा होत नाही.

बोधवचन:- प्रपंचात सुखी होणे म्हणजे भगवंताचे होणे होय.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपले. या अधिवेशनाने सर्वसामान्याला काय दिले? याचा विचार करण्याऐवजी बहुतेकांनी या व्यासपीठाचा वापर उखाळ्या - पाखाळ्या काढण्यासाठी केला, हे सगळ्यांच्याच लक्षात आले असेल.**

### मुद्दे अंगलट येताच अचानक बगल..

एखादा मुद्दा अंगलट येताच त्यापेक्षा मोठा मुद्दा चर्चेला आणायचा आणि वादग्रस्त बोलून मूळ मुद्द्याला बगल द्यायची, हा एक नवा फंडा राजकारण्यांनी शोधला आहे. बघा ना.. मस्साजोग हत्याकांड मागे पडावे, म्हणून ऐन अधिवेशनात औरंग्याच्या कबरीचा प्रश्न आला. तो मागे पडावा म्हणून दिशा सालियन हत्याकांड आले.. ते मागे पडावे म्हणून कुणाल काबरा मदतीला धावला, तोपर्यंत मंत्री जयकुमार गोरे यांच्या खंडणीचा प्रश्न आला ! राजकारण कसेही चालले असले तरी 'ये पब्लिक है, ये सब जानती है!' हे राजकारण्यांनी लक्षात ठेवायला हवे !

### अकेल्या देवेंद्रची चौफेर व्यूहरचना..

बघा तर, सरकार पुढचे महत्त्वाचे प्रश्न किती? बुधवार हा अधिवेशनाचा शेवटचा दिवस ठरला खरा, पण मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या बहुतेक सगळ्या प्रश्नांना आणि शंकांना उत्तरे देत सरकारची बाजू सावरून धरली. यात जयकुमार गोरे यांच्यावर झालेले आरोप ते प्रशांत कोरटकर अटक इथपर्यंतचा प्रवास पूर्ण झाला आहे. उत्तरार्धात मस्साजोगचे संतोष देशमुख प्रकरण तसेच वाल्मिक कराड, आंधळेचा विषय बऱ्यापैकी मागे पडले. औरंग्याची कबर, नागपूर दंगल याकडे मोर्चा वळला किंवा वळवला आणि मग दिशा सालियन प्रकरणात अधिवेशनाचा शेवट करण्याचे नक्की झाल्याचे दिसते.

### अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा 'अर्थ'..

थोडक्यात काय, अर्थसंकल्पीय अधिवेशनात आर्थिक विषय तोंडी लावण्यापुरते घेतले गेले आणि धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावरून सुरु झालेले अधिवेशन आदित्य ठाकरे ड्रग्ज पुरवठा करणारे आहेत, इथंपर्यंत येऊन थांबले. यालाच म्हणतात देवाभाऊचे डोके !

### बोलबच्चन सुप्रियाताईच अडचणीत..

या अधिवेशनात काळापर्यंत सुप्रिया सुळे आणि विरोधक एका मंत्र्याची विकेट गेली, असे सांगत



होते. मात्र, सोमवार रात्रीपासून मंगळवार दुपारपर्यंत दोन आमदार आणि एका खासदाराची विकेट जाईल की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली. या दोन आमदारांच्यात आदित्य ठाकरे आणि रोहित पवार हे दोघे आहेत, तर खासदार दस्तुरखुद्द सुप्रिया सुळे आहेत. महायुतीची अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही चाल फारच गहरी, खोली, विस्तार आणि उंची असलेली आहे, हेच त्यावरून स्पष्ट होते.

### याला म्हणतात देवाभाऊ !

या चालीमागची कालबध्द सूची पाहिली, तर 'बिटवीन लाईन' उकलण्यास मदत होईल. सोमवारी रात्री एका जाहीर समारंभात देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ सालात भाजप – सेना युती न होण्यास उद्धव ठाकरे कसे जबाबदार आहेत, हे सांगितले. उद्धव ठाकरे चार जागांसाठी कसे अडून बसले , दोन पावले मागे आले असते, तर आज त्यांच्यावर जी वेळ आली ती आली नसती, हेही शिंदे सेनेच्या नेत्यांकडून वदवून घेतले. आता राजकारणात उद्धव ठाकरे हुशार नाहीत, हे गृहीतक ठसवण्यासाठी संजय राऊत त्यांच्या जोडीला आले. राऊत यांनी फडणवीस युतीच्या बाजूने होते, हे सांगितले. थोडक्यात, युती न होण्याची अपरिपक्वता उद्धव ठाकरे यांची होती हे सिद्ध केले गेले, हा पहिला मुद्दा !

### सुप्रियाताईबरोबर रोहित देखील..

दुसरीकडे जयकुमार गोरे यांच्यावर महिलेच्या विनयभंगाचा आणि खंडणीचा जो प्रकार सुरु आहे, त्यात फडणवीस यांनी सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांना संशयाच्या घेऱ्यात आणले. प्रभाकर देशमुख यांचा उल्लेख करत आपल्या सांगण्याला बळकटी दिली. प्रभाकर देशमुख हे शरद पवार यांच्या अत्यंत मर्जीतले आहेत. त्यामुळे हे नाव गोवून आपल्या बोलण्यातून त्यांनी केवळ सुळे, रोहित पवार यांना बोलायला लावले नाही तर आता शरद पवार यांनाही बोलावे लागेल. एकनाथ शिंदे यांना उत्तम काम केल्याचे प्रमाणपत्र दिल्यावर पवार सरकारच्या, देवेंद्र फडणवीस आणि तेही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विरोधात काय बोलणार, याकडे आता लक्ष द्यावे लागेल. ते न बोलणे आणि बोलणे दोन्ही पंचायतीचे आहे. तर दिशा सालियन प्रकरणात सालियन कुटुंबाचे वकील नीलेश ओझा यांनी आदित्य ठाकरे हे अमली पदार्थांचे व्यापार, उद्योग करत असल्याचा सनसनाटी आरोप केला आहे. दिशा सालियनच्या हत्येच्या वेळी ते तिथेच होते. त्यांच्याकडे प्रत्यक्षदर्शी पुरावा आहे, असाही त्यांचा दावा आहे. या सगळ्या चक्रव्यूहात आदित्य ठाकरे अडकले तर राजकारणातून ते कायमस्वरूपी बाद होतील. जर व्हायचे नसेल तर शरणागती शिवाय पर्याय नसेल. एकूणच त्यांची देहबोली आणि मनोवृत्ती अहंकाराची आहे, हे पण लक्षात घ्या.

### विरोधक म्हणून फक्त काँग्रेस पाहिजे..

सरते शेवटी विरोधी प्रादेशिक पक्ष राष्ट्रवादी (शप गट), शिवसेना (उबाठा गट) भाजपला नको आहेत. एक तर सोबत या किंवा संपून जा, हा त्यांचा खाक्या आहे. भाजपाचा काँग्रेसमुक्त भारत, असा नारा असला तरी एकमेव पक्ष काँग्रेस विरोधक म्हणून हाताळणे शक्य आहे, सोपे आहे .मात्र, प्रादेशिक पक्षांचे तुकडे सांभाळत बसणे तापदायक आहे. त्यावर हा जालीम उपाय आहे, हे आता स्पष्ट दिसू लागले आहे.

### ठाकरे - पवारांची पोरं अडचणीत !

सुप्रिया सुळे आणि आदित्य ठाकरे एका घेऱ्यात आणले की शरद पवार आणि उद्धव ठाकरे त्या बाहेर जाणार कुठे ? भरकटलेले काँग्रेसचे जहाज चालवणे त्यांना फारसे अवघड नाही, हे देवेंद्र फडणवीस जाणून आहेत. नाना पटोले, विजय वडेट्टीवार जहाज धोक्यात आल्यावर सगळ्यात पहिल्यांदा जहाज सोडतील अथवा विरोधी पक्ष नेतेपदाचे गाजर डोळ्यासमोर ठेवून या.. दोघांचे राजकीय अपहरण कधीही होईल, हे सगळे जण जाणतात.

### ही तर खतरनाक चाणक्यनीति..

देवेंद्र फडणवीसांची चाल अत्यंत खतरनाक आहे. विरोधकांना बरोबर मित्र पक्षांनाही धडकी भरायला लावणारी आहे. म्हणतात ना, विरोधक कबड्डी ची तयारी करून येतो.. प्रसंगी कुस्तीचीही त्याची तयारी असते.. पण, ऐनवेळी फडणवीस बुद्धिबळाचा डाव टाकतात, आणि सिलँबस बाहेरचे प्रश्न आले की विरोधक गारद होतात, ही वस्तुस्थिती आहे.. हा इतिहास आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दिशाचा पोस्टमॉर्टेम रिपोर्ट समोर!

## पोस्टमॉर्टेम रिपोर्टवर फडणवीस यांनी प्रतिक्रिया देणे टाळले

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दिशा सालियनच्या मृत्यूवरुन बरेच आरोप २०२० मध्येही झाले होते आणि अधिवेशनातही हा विषय निघाला होता. दिशा सालियनच्या वडिलांनी पुन्हा एकदा कोर्टात याचिका दाखल केल्याने हा विषय चर्चेत आला होता. दरम्यान दिशा सालियनचा पोस्टमॉर्टेम रिपोर्ट समोर आल्याची माहिती समोर आली. यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.**






दिशा सालियनचा पोस्टमॉर्टेम रिपोर्ट समोर आला. तिचा मृत्यू डोक्याला मार लागल्याने झाल्याचं समोर आलं. मी इतकंच म्हणेन की सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं. आमच्या तरुण मुलाला (आदित्य ठाकरे) तुम्ही जितका त्रास देत आहात त्याच्या वेदना त्याचे घाव आमच्याही हृदयावर होत आहेत. सज्जन मुलाचं चारित्र्यहनन केलं गेलं, कुणी केलं तर ज्यांनी त्याच्या घरचं मीठ खाल्लं त्यांनीच. असंही अरविंद सावंत म्हणाले.दिशा सालियनवर लैंगिक अत्याचार झालेला नाही असं यात नमूद करण्यात आलं आहे. दिशाच्या डोक्याला गंभीर जखमा झाल्याचं आणि अनेक फ्रॅक्चर झाल्याने मृत्यू झाला आहे. डोळे, हात, पाय यांना जखमा झाल्याचा उल्लेख या रिपोर्टमध्ये आहे. ११ जून २०२० ला हे पोस्टमॉर्टेम करण्यात आलं होतं. ही बातमी समोर आल्यानंतर अरविंद सावंत यांनी सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं अशी प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आलं. त्यावेळी त्यांनीही प्रतिक्रिया दिली आहे."मला याबाबत तूर्तास माहिती मिळालेली नाही. माहिती मिळाली की मी या प्रकरणाबाबत बोलेन." अशी एका ओळीची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता. तिनं आत्महत्या केली होती, असा पोलिसांनी दावा केला होता. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणाची सीबीआयकडून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. राज्याचे विधिमंडळ अधिवेशन सुरू असताना या सर्व घडामोडी घडल्यानं त्या प्रकरणावरुन राजकीय वातावरण तापलेलं आहे. अशातच दिशाचा पोस्टमार्टम रिपोर्ट समोर आला. त्यामध्ये दिशाच्या मृतदेहावर जखमा असल्याचं त्यामध्ये नमूद करण्यात आलं आहे.दिशा सालियनचा पोस्टमॉर्टेम रिपोर्ट समोर आला. तिचा मृत्यू डोक्याला मार लागल्याने झाल्याचं समोर आलं. मी इतकंच म्हणेन की सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं. आमच्या तरुण मुलाला (आदित्य ठाकरे) तुम्ही जितका त्रास देत आहात त्याच्या वेदना त्याचे घाव आमच्याही हृदयावर होत आहेत. सज्जन मुलाचं चारित्र्यहनन केलं गेलं, कुणी केलं तर ज्यांनी त्याच्या घरचं मीठ खाल्लं त्यांनीच. असंही अरविंद सावंत म्हणाले.दिशा सालियनवर लैंगिक अत्याचार झालेला नाही असं यात नमूद करण्यात आलं आहे. दिशाच्या डोक्याला गंभीर जखमा झाल्याचं आणि अनेक फ्रॅक्चर झाल्याने मृत्यू झाला आहे. डोळे, हात, पाय यांना जखमा झाल्याचा उल्लेख या रिपोर्टमध्ये आहे. ११ जून २०२० ला हे पोस्टमॉर्टेम करण्यात आलं होतं.

### मला माहिती नाही : फडणवीस

ही बातमी समोर आल्यानंतर अरविंद सावंत यांनी टीव्ही ९ शी बोलताना सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं अशी प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आलं. त्यावेळी त्यांनीही प्रतिक्रिया दिली आहे."मला याबाबत तूर्तास माहिती मिळालेली नाही. माहिती मिळाली की मी या प्रकरणाबाबत बोलेन." अशी एका ओळीची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता. तिनं आत्महत्या केली होती, असा पोलिसांनी दावा केला होता. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

---

# दिशावर लैंगिक आत्याचार झाला नाही!

## दिशा सालियानच्या वडिलांची नार्को टेस्ट करा: अरविंद सावंत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात २०२० मध्ये अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची आत्महत्या आणि त्याची व्यवस्थापक दिशा सालियनचा मृत्यू झाल्यानंतर खळबळ उडाली होती. त्यानंतर आता पाच वर्षांनी पुन्हा एकदा दिशा सालियन मृत्यू प्रकरण चर्चेत आले आहे. दिशाच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. या याचिकेत दिशा सालियनवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.**



यानंतर राज्यात सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांसह दिशा सालियनच्या वडिलांच्या वकिलांनी दिशा सालियनचा मृत्यू नैसर्गिक नसून, त्यामध्ये अनेक संशयास्पद बाबी असल्याचा आरोप होता. याचबरोबर काहींनी दिशाच्या हत्येमध्ये शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरेंचा सहभाग असल्याचाही आरोप केला होता. त्यानंतर आता दिशाचा पोस्टमोर्टम रिपोर्ट समोर आला असून, त्यामध्ये दिशावर लैंगिक आत्याचार झाला नसल्याचे म्हटले आहे.दिशा सालियानचा पोस्टमोर्टम रिपोर्ट समोर आल्यानंतर शिवसेनेचे खासदार (उद्धव ठाकरे) अरविंद सावंत यांनी, "न्यायाला विलंब लागतो पण सत्याचाच विजय होतो. आमचा आदित्य कसा आहे हे आम्हाला ठावूक आहे", अशी प्रतिक्रिया दिली आहे.टीव्ही ९ या वृत्तवाहीनीशी बोलताना खासदार अरविंद सावंत म्हणाले की, "सत्य परेशान हो सकता हैं पराजीत नही. आमच्या तरुण मुलाला तुम्ही जितका त्रास देत आहात, त्याच्या वेदना, त्याचे घाव आमच्या हृदयावरही होत आहेत. इतक्या सज्जन मुलाचे चारित्र्यहनन करणं आणि हे कुणी केलं तर त्याच्या घरचं मीठ खाल्लं त्यांनीच. चीड त्याची आहे."ते पुढे म्हणाले की, "आहे हे स्पष्ट झाले आहे. देर आये, दुरूस्त आये. न्यायाला विलंब लागतो पण सत्याचा विजय होतो. आमचा आदित्य कसा आहे, हे आम्हाला ठावूक आहे. त्या मुलाला उभा महाराष्ट्र पाहतो. तो कसा आहे हे सर्वांना ठाऊक आहे. निर्व्यसनी मुलावर असले घाणेरडे आरोप करता. महाराष्ट्राचं राजकारण कोणत्या थरावर घेऊन गेला आहात. पण, एक आनंद आहे की, सत्य शेवटी समोर आले."यावेळी खासदार अरविंद सावंत यांनी दिशा सालियनच्या वडिलांची नार्को टेस्ट करण्याची मागणी केली आहे. ते म्हणाले, "आता मी उलट मागणी करेन की, दिशा सालियानच्या वडिलांची नार्को टेस्ट करा. पाच वर्षांनंतर त्यांना हा साक्षात्कार कसा झाला याची नार्को टेस्ट केली पाहिजे."

### आमच्या हृदयावर घाव होत आहेत

राज्यात सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांसह दिशा सालियनच्या वडिलांच्या वकिलांनी दिशा सालियनचा मृत्यू नैसर्गिक नसून, त्यामध्ये अनेक संशयास्पद बाबी असल्याचा आरोप होता. त्यानंतर आता दिशाचा पोस्टमोर्टम रिपोर्ट समोर आला असून, त्यामध्ये दिशावर लैंगिक आत्याचार झाला नसल्याचे म्हटले आहे.

# उत्तर प्रदेशात मुसलमान सर्वात सुरक्षित!

## उत्तर प्रदेशात भाजपाची सत्ता आल्यापासून जातीय दंगली होणं बंद झालं



। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं आहे की त्यांच्या राज्यात सर्व धर्मांचे लोक सुरक्षित आहेत. आदित्यनाथ म्हणाले, “मी एक योगी असून राज्यातील प्रत्येकाच्या सुखाची कामना करतो. आमच्या राज्यात हिंदू सुरक्षित असेल तर मुसलमान देखील सुरक्षित आहे. अनेक हिंदू कुटुंब राहत असलेल्या भागात एखादं मुस्लीम कुटुंब वास्तव्यास असेल तर ते कुटुंब स्वतःला सुरक्षित समजतं. मात्र, १०० मुस्लीम कुटुंब असलेल्या भागात ५० हिंदूंची घरं असतील तर ते सुरक्षित असतात का?”**

योगी आदित्यनाथ म्हणाले, “एखाद्या परिसरात हिंदूंची १०० घरं असतील तर तिथे राहणारं एक मुस्लीम कुटुंब स्वतःला सुरक्षित समजतं. तिथे त्यांना त्यांची धार्मिक कामं करण्याचं स्वातंत्र्य असतं. परंतु, १०० मुस्लीम कुटुंब वास्तव्यास असलेल्या परिसरात ५० हिंदू सुरक्षित असतात का? नाही. बांगलादेश हे त्याचं उदाहरण आहे. पूर्वी पाकिस्तान त्याचं उदाहरण होता. परंतु, तिथे काय झालं ते सर्वांना माहिती आहे. पाकिस्तानात काय झालं? अफगाणिस्तानात काय झालं? याची आपल्याला कल्पना आहे. जर कुठे धूर दिसत असेल तर आपण सावध झालं पाहिजे. कोणाला इजा झाली असेल तर इतरांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. आम्ही राज्यकर्ते म्हणून राज्यातील प्रत्येकाशी सारखाच व्यवहार करतो.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणाले, “आमच्या राज्यात सर्वच जण सुरक्षित आहेत. मुसलमान सर्वात सुरक्षित आहेत. या राज्यात आमची (भाजपाची) सत्ता आल्यापासून जातीय दंगली होणं बंद झालं आहे.

आमच्या राज्यात हिंदू सुरक्षित आहेत तर मुसलमान देखील तितकेच सुरक्षित आहेत. २०१७ च्या आधी उत्तर प्रदेशात दंगली झाल्या होत्या. हिंदूंची दुकानं जाळली जात होती. त्याचवेळी काही मुसलमानांची दुकानं देखील पेटवण्यात आली. हिंदूंची घरं पेटली, दुसरीकडे मुसलमानांची घरं देखील पेटली. मात्र आता सगळे सुरक्षित आहेत. मी उत्तर प्रदेशचा नागरिक आहे आणि मी एक योगी देखील आहे. मी राज्यातील सर्वांच्या आनंदाची कामना करतो. मी सर्वांना एकत्र आणून सर्वांचा विकास करण्याचा विचार करत असतो.सनातन हा विश्वातील सर्वात प्राचीन धर्म आहे असं म्हणत योगी आदित्यनाथ यांनी दावा केला की आजवर कुठल्याही हिंदू शासकाने आपल्या शक्तीचा वापर करून, बळाचा वापर करून कुठेही हिंसा केली नाही, कुठलाही प्रदेश ओरबाडला नाही.योगी आदित्यनाथ म्हणाले, “एखाद्या परिसरात हिंदूंची १०० घरं असतील तर तिथे राहणारं एक मुस्लीम कुटुंब स्वतःला सुरक्षित समजतं. तिथे त्यांना त्यांची धार्मिक कामं करण्याचं स्वातंत्र्य असतं. परंतु, १०० मुस्लीम कुटुंब वास्तव्यास असलेल्या परिसरात ५० हिंदू सुरक्षित असतात का? नाही. बांगलादेश हे त्याचं उदाहरण आहे. पूर्वी पाकिस्तान त्याचं उदाहरण होता. परंतु, तिथे काय झालं ते सर्वांना माहिती आहे. पाकिस्तानात काय झालं? अफगाणिस्तानात काय झालं? याची आपल्याला कल्पना आहे. जर कुठे धूर दिसत असेल तर आपण सावध झालं पाहिजे. कोणाला इजा झाली असेल तर इतरांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. आम्ही राज्यकर्ते म्हणून राज्यातील प्रत्येकाशी सारखाच व्यवहार करतो.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणाले, “आमच्या राज्यात सर्वच जण सुरक्षित आहेत. मुसलमान सर्वात सुरक्षित आहेत. या राज्यात आमची (भाजपाची) सत्ता आल्यापासून जातीय दंगली होणं बंद झालं आहे. आमच्या राज्यात हिंदू सुरक्षित आहेत तर मुसलमान देखील तितकेच सुरक्षित आहेत. २०१७ च्या आधी उत्तर प्रदेशात दंगली झाल्या होत्या. हिंदूंची दुकानं जाळली जात होती. त्याचवेळी काही मुसलमानांची दुकानं देखील पेटवण्यात आली. हिंदूंची घरं पेटली, दुसरीकडे मुसलमानांची घरं देखील पेटली. मात्र आता सगळे सुरक्षित आहेत. मी उत्तर प्रदेशचा नागरिक आहे आणि मी एक योगी देखील आहे. मी राज्यातील सर्वांच्या आनंदाची कामना करतो.

### कुठेही हिंसा केली नाही

मी सर्वांना एकत्र आणून सर्वांचा विकास करण्याचा विचार करत असतो.सनातन हा विश्वातील सर्वात प्राचीन धर्म आहे असं म्हणत योगी आदित्यनाथ यांनी दावा केला की आजवर कुठल्याही हिंदू शासकाने आपल्या शक्तीचा वापर करून, बळाचा वापर करून कुठेही हिंसा केली नाही, कुठलाही प्रदेश ओरबाडला नाही.

# ईडीचे माजी प्रमुख मोदींना देणार आर्थिक सल्ला

## संजय मिश्रा यांचीमोदींच्या आर्थिक सल्लागारांच्या सचिवपदी नियुक्ती



। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाचे माजी प्रमुख संजय कुमार मिश्रा यांना आता पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आर्थिक सल्लागारांच्या परिषदेत घेण्यात आलं आहे. आर्थिक सल्लागार परिषदेचे सचिव या पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय कुमार मिश्रा हे १९८४ च्या बॅचचे उत्तर प्रदेश केडरचे आयएस अधिकारी आहेत.**

ईडीच्या संचालक या पदावर संजय कुमार मिश्रा यांना २०१८ मध्ये दोन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्त करण्यात आलं होतं. त्यानंतर सरकारने त्यांना अनेकदा मुदतवाढ दिली होती. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दणक्यानंतर मिश्रा यांना २०२३ मध्ये पद सोडावं लागलं होतं. मिश्रा ईडीचे संचालक असताना अनेक वजनदार नेत्यांवर ईडीची कारवाई झाली होती. तपास संस्थेने चार हजार प्रकरणं नोंदवली आणि ३ हजारांहून अधिक शोध मोहिमा केल्या होत्या. याच संजय कुमार मिश्रा यांना आता टीम मोदींच्या आर्थिक सल्लागारांच्या परिषदेत पूर्ण वेळ सदस्य करण्यात आलं आहे.ईडी प्रमुख म्हणून संजय कुमार मिश्रा यांनी अनेक हाय-प्रोफाइल प्रकरणांची चौकशी केली. यामध्ये माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती, विद्यमान मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि पश्चिम बंगालचे माजी शिक्षणमंत्री पार्थ चॅटर्जी यांचा या चौकशीत समावेश आहे. त्यांच्या कार्यशैलीबाबत राजकीय वर्तुळात अनेक चर्चा रंगल्या होत्या. दरम्यान त्यांना आर्थिक सल्लागारांच्या परिषदेत घेतल्यावर काँग्रेसने टीका केली आहे.काँग्रेसने संजय कुमार मिश्रा यांच्यावर टीका करताना पातळी सोडली आहे. पाळीव प्राण्यांना निवृत्ती दिली जात नाही ते कायमच पे रोलवर असतात अशी खोचक टीका केरळ काँग्रेसने एक्स पोस्टवर केली आहे.परिषदेचे माजी अध्यक्ष बिबेक देबरॉय यांच्या निधनानंतर ही नियुक्ती करण्यात आली आहे. १ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांच्या निधनानंतर हे पद रिक्त होतं. मिश्रा यांच्या नियुक्तीमुळे आर्थिक धोरणे आणि प्रशासकीय कार्यक्षमतेबद्दल परिषदेला नवीन दृष्टीकोन मिळण्याची अपेक्षा आहे.

### राजकीय वर्तुळात अनेक चर्चा रंगल्या

**मिश्रा ईडीचे संचालक असताना अनेक वजनदार नेत्यांवर ईडीची कारवाई झाली होती. तपास संस्थेने चार हजार प्रकरणं नोंदवली आणि ३ हजारांहून अधिक शोध मोहिमा केल्या होत्या. याच संजय कुमार मिश्रा यांना आता टीम मोदींच्या आर्थिक सल्लागारांच्या परिषदेत पूर्ण वेळ सदस्य करण्यात आलं आहे.**

# सिद्धार्थ जाधवने सांगितला चित्रपटातून न सांगता काढल्याचा प्रसंग

एखाद्या कलाकाराला प्रोजेक्टमधून अचानक काढलं जाणं ही त्या कलाकारासाठी साहजिकच मोठी आणि दु:खद गोष्ट असते. मात्र यातून अनेक कलाकारांना जावच लागतं. प्रत्येक कलाकाराच्या आयुष्यात असे प्रसंग येतंच असतात. असाच काहीसा प्रसंग अभिनेता सिद्धार्थ जाधवच्या (SIDDHARTH JADHAV) आयुष्यात आला होता आणि याबद्दल त्याने स्वत: भाष्य केलं आहे. सिद्धार्थच्या अभिनयाचे आज लाखों चाहते आहेत. सिद्धार्थने आजवर हिंदी, मराठीसह इतर भाषांतील प्रेक्षकांचे मनोरंजन केलं आहे. पण अभिनेत्याला त्याच्या संघर्ष काळात एका चित्रपटातून न सांगता काढण्यात आले होते. याबद्दल सिद्धार्थने अमोल परचुरेंच्या कँचअप पॉडकास्टमध्ये सांगितलं आहे. यावेळी सिद्धार्थने असं म्हटलं की, "प्रत्येक माणसाच्या आयुष्यात पडाव यायलाच



पाहिजे. ठेहराव यायलाच पाहिजे. त्या काळात माझे काही सिनेमे चालले नव्हते आणि फार सिनेमे आलेही नाहीत. मग असं झालं की आता काय होणार? मग एका सिनेमामधून तर मला काढलंच होतं."यापुढे तो म्हणाला की, "खरंतर तेव्हा मला त्या सिनेमाची गरज होती. कारण त्यात मराठीतले खूप मातब्बर अभिनेते होते. पण हे प्रत्येक कलाकाराबरोबर होतं. फक्त त्यावर तुम्ही कशी प्रतिक्रिया देता हे महत्त्वाचं असतं. तेव्हा मला कळलं नाही की, माझं कुठे चुकलं. कारण मी तर कमी पैसे घ्यायचो. कधी तर घ्यायचोच नाही. तेव्हा तो सिनेला माझ्याकडे आला आणि मी त्यांना 'पैसे तुम्ही म्हणाल ते' असं सांगितलं".

## 'दंगल'मधील भूमिकेबद्दल आमिर खान म्हणाला

आमिर खान(AAMIR KHAN)ची प्रमुख भूमिका असलेला दंगल हा सिनेमा आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर सर्वात जास्त कमाई करत विक्रम रचला होता. या गीता फोगाट, बबिता फोगाट यांच्या आयुष्यावर आधारित हा सिनेमा चांगलाच गाजला होता. आमिर खानची या चित्रपटातील भूमिकादेखील लोकप्रिय ठरली होती. नितेश तिवारी यांनी दंगल चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. आता अभिनेत्याने एका मुलाखतीत त्याने दंगल चित्रपटातील त्याच्या भूमिकेला सुरुवातीला नकार दिला होता, असा खुलासा केला आहे.आमिर खानने नुकतीच जस्ट टू फिल्मी या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत आमिर खान म्हणाला, "दंगल चित्रपटाच्या आधी य धूम ३ मध्ये काम करत होतो. त्यामध्ये मी चांगला दिसणे, वजन कमी असणे आवश्यक होते. त्यासाठी खूप मेहनत घेतली. त्यामुळे मी कमी वयाचा दिसत होतो. दंगल चित्रपटाचा निर्माता नितेश माझ्याकडे ही भूमिका घेऊन आला. त्यावेळी मी त्याला सांगितले की ही चांगली गोष्ट आहे. पण आताच मी धूम ३ साठी वजन कमी केले आहे आणि त्यामुळे खूप तंदुरूस्त दिसत आहे आणि आता मी ५५ वर्षीय चार मुलींच्या वडिलांची भूमिका करावी असे तुम्हाला का वाटते?"आमिर या भूमिकेचा असा विचार करायचा की शाहरूख व सलमान खानला असे वाटते की एका म्हाताऱ्या माणसाची भूमिका मी करावी.

## जुई गडकरीने गायली भूपाळी



चित्रपट, मालिकांत दिसणारे अनेक कलाकार हे सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात सक्रिय असल्याचे दिसतात. ते सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत असतात. सोशल मीडियामुळे चाहत्यांनादेखील कलाकारांविषयी अनेक बाबी माहित होतात. चाहते त्यांना आवडणाऱ्या कलाकारांना पाठिंबा देतात. आता अभिनेत्री जुई गडकरी((JUI GADKARI) सर्वांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. याचे कारण म्हणजे तिने एक भूपाळी गायली आहे. अभिनेत्रीने तिच्या गोड आवाजाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. अभिनेत्री जुई गडकरी ही लोकप्रिय कलाकारांपैकी एक आहे. अभिनेत्रीचा चाहतावर्ग मोठा आहे. सध्या स्टार प्रवाह वाहिनीवरील 'ठरलं तर मग'(THARALA TAR MAG) या मालिकेत ती प्रमुख भूमिका साकारत आहे. सायली ही भूमिका जुईने साकारली असून अमित भानुशालीने ठरलं तर मग मालिकेत अर्जुन ही भूमिका साकारली आहे. आता सोशल मीडियावर जुई गडकरीचा एक व्हिडीओ लक्ष वेधून घेत आहे.जुई गडकरीने तिच्या सोशल मिडिया अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये ती भूपाळी गाताना दिसत आहे. जुईने 'घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला', ही भूपाळी गायली आहे. प्रवाह पिक्चर प्रिमिअरवर ३० मार्चला 'अमर भूपाळी' हा चित्रपट दाखवला जाणार आहे. या निमित्ताने जुईने ही भूपाळी गायली आहे. हा व्हिडीओ शेअर करताना अभिनेत्रीने स्टार प्रवाह व प्रवाह पिक्चर या इन्स्टाग्राम अकाउंटला टॅग केले आहे. आता जुईच्या या व्हिडीओवर अनेक चाहत्यांनी कमेंट करत अभिनेत्रीचे कौतुक केले आहे.एक नेटकरी म्हणाला, "ऐकायला खूप गोड वाटत आहे. खूप छान", दुसऱ्या एका नेटकऱ्याने म्हटले, "ही खरी नायिका. कारण आम्ही तुम्हाला एक आदर्श सून,बायको,वहिनी ,मैत्रीण अशा नात्यात पाहतो आणि तुम्हीही ते अप्रतिम काम करून

## ऐश्वर्या राय बच्चनच्या गाडीला बसची धडक



बॉलीवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनच्या गाडीला मुंबईत बसने धडक दिल्याची माहिती समोर आली आहे. बुधवारी ( २६ मार्च ) ही घटना घडली. पापाराझी पेज 'वरिंदर चावला' याने ऐश्वर्या रायच्या गाडीचा व्हिडीओ देखील सोशल मीडियावर शेअर केला आहे. अभिनेत्रीच्या गाडीला बसने धडक दिल्यावर रस्त्यावर मोठा गोंधळ निर्माण झाला होता. ऐश्वर्या नेहमी तिची लग्झरी गाडी टोयोटा वेलफेयरमधून प्रवास करते. अभिनेत्रीच्या जुहू येथील निवासस्थानाबाहेर बेस्ट बसने तिच्या गाडीला धडक दिल्याची घटना घडली आहे. याचे अनेक व्हिडीओ देखील पापाराझी पेजेसवरून शेअर करण्यात आले आहेत. ऐश्वर्याच्या गाडीचा अपघात झाल्याचं समजताच तिच्या सगळ्या चाहत्यांनी अभिनेत्रीबद्दल काळजी व्यक्त केली होती. आता याबद्दल तिच्या मॅनेजरने माहिती दिली आहे.ऐश्वर्याच्या गाडीला बसने धडक दिली, तेव्हा घटनास्थळी गर्दी जमली होती. यानंतर तिच्या कारचा चालक आणि बॉडीगार्ड रस्त्यावर उतरुन गाडीची तपासणी करत होते. यामध्ये कोणाचंही गंभीर नुकसान झालेलं नाही. थोडावेळ गाडीची तपासणी केल्यावर ऐश्वर्याच्या अंगरक्षकांनी गाडी घटनास्थळावरून नेली.ऐश्वर्या रायच्या कारला बसने धडक दिल्याच्या वृत्ताला तिच्या वैयक्तिक मॅनेजरने देखील 'एबीपी न्यूज'शी संवाद साधताना दुजोरा दिला आहे. बेस्ट बसने धडक दिली तेव्हा ऐश्वर्या गाडीत उपस्थित नव्हती. सर्व काही ठीक आहे अशी प्रतिक्रिया मॅनेजरने दिली आहे.दरम्यान, ऐश्वर्या राय बच्चनच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर ती मणिरत्नमच्या 'पोन्नियिन सेल्वन: पार्ट २' मध्ये झळकली होती. याशिवाय काही महिन्यांपूर्वीच ऐश्वर्याला दुबईतील 'साउथ इंडियन इंटरनॅशनल मूव्ही अवॉर्ड्स'मध्ये (SIIMA) सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं होतं.

## नम्रताला नाटकात काम न करण्याचा सल्ला

'जिच्या विनोदाला नाही ठाव', अशी स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करीत 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमातून घराघरांत पोहोचलेली लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव (महाराष्ट्राची हास्यजत्रा' आणि अशा अनेक कार्यक्रमांमधील विनोदी अभिनयाने तिनं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आपल्या विनोदाच्या उत्तम टायमिंगच्या जोरावर तिनं प्रेक्षकांना भरभरून हसवलं आहे. तसेच चित्रपटांमधील तिच्या काही भूमिकांमुळे नम्रताच्या अभिनयाचा प्रचंड मोठा चाहतावर्ग आहे. अनेक मालिका, नाटक व चित्रपटांमधून काम करीत नम्रतानं आज सिनेसृष्टीत स्वत:चं नाव कमावलं आहे. पण, या हरहुन्नरी अभिनेत्रीला स्वत:च्या लेकानं नाटकात काम न करण्याचा सल्ला दिला होता. त्याबद्दल स्वत: नम्रतानं वक्तव्य केलं आहे. नुकताच 'झी नाट्य गौरव' पुरस्कार सोहळा पार पडला. तेव्हा नम्रतानं 'राजश्री मराठी'शी साधलेल्या संवादात याबद्दल सांगितलं आहे. यावेळी नम्रतानं लेकानं दिलेल्या या सल्ल्याबद्दलचा किस्सा सांगितला. हा किस्सा सांगताना नम्रता म्हणाली, "कुर्रर्रर नाटकाच्या एका प्रयोगाला मी त्याला माझ्याबरोबर घेऊन गेले होते. तेव्हा तो मध्यंतरात माझ्याकडे रडत रडत आला आणि म्हणाला की, आई तू नाटकात काम नाही करायचं. तेव्हा मला असं झालं की, हा मला असा का बोलत आहे.

# केकेआरचा राजस्थानवर विजय!

## क्विंटन डिकॉक ठरला हिरो; रॉयल्सचा घरच्या मैदानावरही पराभव

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**क्विंटन डिकॉकच्या ९७ धावांच्या प्रभावी खेळीच्या जोरावर केकेआरने राजस्थानचा पराभव करत अखेरीस गुणतालिकेत आपले खाते उघडले आहे. केकेआर संघाने डिकॉकच्या शानदार आणि प्रसंगी सावध खेळीच्या जोरावर रॉयल्सचा त्यांच्या घरच्या मैदानावर ८ विकेट्सने पराभव केला आहे. गुवाहाटीची खेळपट्टी फिरकीला अनुकूल होती आणि जिथे धावा करणं एक मोठं आव्हान होतं.**



राजस्थानचा संघ या खेळपट्टीवर चांगली धावसंख्या उभारू शकला नाही. अथवा कोणताही फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. याचा फटका संघाला बसला.प्रथम फलंदाजी करताना राजस्थान संघ केवळ १५१ धावा करू शकला, प्रत्युत्तरात कोलकाताला लक्ष्य गाठण्यात फारशी अडचण आली नाही. कोलकाताच्या विजयाचा हिरो ठरला तो डी कॉक, ज्याने कोलकाताकडून खेळताना पहिलं अर्धशतक झळकावलं. डी कॉकने ६१ चेंडूत ८ चौकार आणि ६ षटकारांसह ९७ धावांची नाबाद खेळी खेळली, त्याचे शतक हुकले पण डी कॉकची खेळी खूप खास ठरली. कारण गुवाहाटीची खेळपट्टी फलंदाजीसाठी सोपी नव्हती आणि तो शेवटपर्यंत क्रीझवर राहत केकेआरला मोसमातील पहिला विजय मिळवून माघारी परतला.गुवाहाटीच्या खेळपट्टीवर फलंदाजी सोपी नव्हती आणि हे जाणून घेत पॉवरप्लेमध्ये कोलकाताने संथ सुरुवात केली. पॉवरप्लेमध्ये केकेआरला फक्त ४० धावा करता आल्या, संघाने ७.४ षटकांत ५० धावांचा टप्पा गाठला. मोईन अली आणि अजिंक्य रहाणे सहज फलंदाजी करू शकले नाहीत. पण क्विंटन डि-कॉकने प्रभावी खेळी केली. डि-कॉकने ३६ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर डि-कॉकने अंगक्रिश रघुवंशीसह ३० चेंडूत ५० धावांची भागीदारी करत केकेआरचा विजय निश्चित केला.राजस्थान रॉयल्सने नाणेफेक गमावली आणि प्रथम फलंदाजीसाठी उतरला. सॅमसन आणि जैस्वाल यांनी संघाला वेगवान सुरुवात करून दिली, मात्र वैभव अरोराने चौथ्या षटकात विकेट घेत केकेआरला पहिले यश मिळवून दिले. सॅमसन बाद झाल्यानंतर रियान परागने वेगवान फलंदाजी केली. त्याने १६६ च्या स्ट्राईक रेटने १५ चेंडूत ३ षटकारांसह २५ धावा केल्या. यशस्वी जैस्वाल २९ धावांवर बाद झाला. वरुण चक्रवर्तीनेही रियान परागला २५ धावांवर बाद केलं. नितीश राणालाही केवळ ८ धावा करता आल्या. हसरंगा ४ धावा करत माघारी परतला. ध्रुव जुरेलने मैदानावर टिकून राहत ३३ धावा केल्या.

### अरोरा यांनी प्रत्येकी 2 विकेट घेतले

जोफ्रा आर्चरच्या षटकारांमुळे राजस्थान १५० धावांचा आकडा गाठू शकला.क्विंटन डॉ-कॉकसह फिरकीपटू कोलकाताच्या विजयाचे हिरो ठरले. वरुण चक्रवर्तीने ४ षटकांत केवळ १७ धावा देत २ विकेट घेतले. सुनील नरेन आजारी असल्याने त्याच्या जागी आलेल्या मोईन अलीनेही २३ धावांत २ विकेट घेतले. हर्षित राणा आणि वैभव अरोरा यांनी प्रत्येकी २ विकेट घेतले. राजस्थानचा संघ या खेळपट्टीवर चांगली धावसंख्या उभारू शकला नाही. अथवा कोणताही फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. याचा फटका संघाला बसला.प्रथम फलंदाजी करताना राजस्थान संघ केवळ १५१ धावा करू शकला, प्रत्युत्तरात कोलकाताला लक्ष्य गाठण्यात फारशी अडचण आली नाही. कोलकाताच्या विजयाचा हिरो ठरला तो डी कॉक, ज्याने कोलकाताकडून खेळताना पहिलं अर्धशतक झळकावलं.

# क्विंटन डिकॉकच्या कॅचने सगळेच चकित

## क्विंटन डी कॉकच्या झेलचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजस्थान रॉयल्स आणि केकेआरमध्ये गुवाहाटीच्या मैदानावर सामना खेळवला जात आहे. या सामन्यात केकेआरच्या गोलंदाजांनी पहिल्या डावात चांगली गोलंदीज केली. नाणेफेक गमावत रियान परागच्या नेतृत्वाखाली राजस्थानचा संघ फलंदाजीसाठी उतरला आणि मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. पण संघाने जेमतेम १५१ धावा केल्या आहेत. पण पहिल्या डावातील क्विंटन डि-कॉकच्या झेलने सर्वांचं लक्ष वेधलं.**



क्विंटन डी कॉकच्या झेलचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. विकेट्सच्या मागे तैनात असलेले डिकॉक झेलसाठी धावत येत असल्याचे दिसून येते. धावण्यापूर्वी डिकॉक त्याचे हेल्मेट काढतो आणि बाजूला टाकतो आणि इतरांनाही थांबवतो आणि यशस्वीरित्या झेल टिपतो.रियान परागने घऱ्च्या मैदानावर फलंदाजीला येताच षटकारांच्या मदतीने विस्फोटक फलंदाजी करण्यास सुरूवात केली. त्याने चांगली सुरूवात केली पण मोठी खेळी खेळण्यात तो अपयशी ठरला. वरूण चक्रवर्तीच्या आठव्या षटकात रियान परागने आपली विकेट गमावली.फिरकीपटू वरूण चक्रवर्तीने आठव्या षटकातील पाचवा चेंडू ११८च्या वेगाने टाकला. या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात चेंडू बॅटची कड घेत हवेत उंच उडाला.

विकेट्सच्या मागे असणाऱ्या डिकॉकने चेंडू वर गेलेला पाहून लगेच आपले हेल्मेट काढून टाकले आणि थांबा सांगत त्याने पिचच्या दिशेने धाव घेतली आणि रियान परागचा यशस्वी झेल टिपला. परागने १५ चेंडूत ३ षटकारांच्या मदतीने २५ धावा केल्या. या दरम्यान त्याचा स्ट्राइक रेट १६६.६७ होता. पराग वेगाने धावा काढण्याचा प्रयत्न करत होता, त्यामुळे त्याने लवकर विकेट गमावली. KKR राजस्थान विरुद्ध मोसमातील दुसरा साखळी सामना खेळत आहे. संघाने पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळला होता. RCB विरुद्धच्या सामन्यात KKR ला ७ विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला.क्विंटन डी कॉकच्या झेलचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. विकेट्सच्या मागे तैनात असलेला डिकॉक झेलसाठी धावत येत असल्याचे दिसून येते.

### परागने 25 धावा केल्या

धावण्यापूर्वी डिकॉक त्याचे हेल्मेट काढतो आणि बाजूला टाकतो आणि इतरांनाही थांबवतो आणि यशस्वीरित्या झेल टिपतो.रियान परागने घऱ्च्या मैदानावर फलंदाजीला येताच षटकारांच्या मदतीने विस्फोटक फलंदाजी करण्यास सुरूवात केली. त्याने चांगली सुरूवात केली पण मोठी खेळी खेळण्यात तो अपयशी ठरला. वरूण चक्रवर्तीच्या आठव्या षटकात रियान परागने आपली विकेट गमावली. फिरकीपटू वरूण चक्रवर्तीने आठव्या षटकातील पाचवा चेंडू ११८च्या वेगाने टाकला. या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात चेंडू बॅटची कड घेत हवेत उंच उडाला. विकेट्सच्या मागे असणाऱ्या डिकॉकने चेंडू वर गेलेला पाहून लगेच आपले हेल्मेट काढून टाकले आणि थांबा सांगत त्याने पिचच्या दिशेने धाव घेतली आणि रियान परागचा यशस्वी झेल टिपला.परागने १५ चेंडूत ३ षटकारांच्या मदतीने २५ धावा केल्या. या दरम्यान त्याचा स्ट्राइक रेट १६६.६७ होता. पराग वेगाने धावा काढण्याचा प्रयत्न करत होता, त्यामुळे त्याने लवकर विकेट गमावली. KKR राजस्थान विरुद्ध मोसमातील दुसरा साखळी सामना खेळत आहे. संघाने पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळला होता. RCB विरुद्धच्या सामन्यात KKR ला ७ विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला.



Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com

# मोरया शिक्षण संस्था

## Computer Vacation Batch

**ADMISSIONS OPEN 2025-26**



| | | | |
|---|---|---|---|
| 'C' भाषा ₹ १३००/- | 'C++' भाषा ₹ १३००/- | बेसिक जावा ₹ १३००/- | स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/- |
| बेसिक टॅली ₹ १५००/- | एम.एस. ऑफिस ₹ १५००/- | कोरल ड्रॉ ₹ ११००/- | Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/- |

सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.

**ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100**